महाराष्ट्र शासन
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती, जि.पुणे.
प्लॉट नं.पी.१०७, एम.आय.डी.सी.आवार, महिला रुग्णालया समोर, बारामती, जि.पुणे.पिन नं.४१३१३३
Email Id- deangmcbaramati@gmail.com Website: www.gmcbaramati.org

जा.क्र.पुअहोशावैमबा/प.वि.जाहिरात/2019 /२५ दि. 0८/०५/२०२५

जाहिरात

विषयः- वरिष्ठ निवासी यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशी नुसार १८० दिवसांकरिता भरण्याबाबत...

संदर्भः- १.शासन निर्णय १९९३
२.शासननिर्णयक्रंपदनि-२०१९/प्र.क्र/१२/भाग.-१/वैसेवा-२ दि.१ फेब्रुवारी,२०२१
३.शासन निर्णय क्र एलईसी-४३२२/प्र.क्र.२०१/वैसेवा-३ दि.०६/०१/२०२३
४.शासन निर्णय क्र एमईडी-२००८/प्र.क्र.३९३/शिक्षण-२ दि.०२/१२/२०२३
५.मा.संचालनालयाचे पत्र क्र DMER -१२०१६/५/२०२२-EDU दि.१९/०१/२०२३
६.मा. संचालनालयाचे पत्र क्र DMER -११०२०/१३/२०२२-CETIT दि.१९/०१/२०२३

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या त्रृटीच्या पुर्ततेसाठी तसेच दैनंदिन रुग्णसेवा अबाधित राहण्याच्या दृष्टीने अधिष्ठाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती. या संस्थेच्या अस्थापनेवरील अचिकीत्सालयीन व चिकीत्सालयीन विषयांतील रिक्त असलेली **वरिष्ठ निवासी** यांची पदे मा.सचालनालय, मुंबई यांच्या मार्फत बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवाराची नियुक्ती होईपर्यंत किंवा बदलीने उमेदवार उपलब्ध होइपर्यंत किंवा तदर्थ पदोन्नतीने कार्यरत सहयोगी प्राध्यापक मुळ पदावर पदावनत होईपर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत, स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार १८० दिवसांच्या कालावधीकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत गुणवत्तेनुसार भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागवण्यात येत आहेत. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविण्यात येणार नाही.यांची नोंद घेण्यात यावी.

अर्ज सादर करावयाचा कालावधी दि.०८/०५/२०२५ ते १६/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत.

मुलाखतीचा दिनांकः- व वेळ दि.२२/०५/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता

मुलाखतीचे ठिकाणः- मा.अधिष्ठाता दालन. पुण्यश्लोक अहिल्यादेवी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती.

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी (शासकीय सुटटी वगळुन) या कार्यालयातून जाहिरातीच्या दिनांकापासुन विहीत कालावधीत अर्ज शुल्क रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) रोखपाल शाखेत भरुन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत अर्जात नमुद कागदपत्रे प्रमाणपत्रांसह साक्षांकीत केलेल्या प्रती अर्जासोबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह साक्षांकीत केलेल्या प्रतींचा एक संच सोबत घेउन येणे आवश्यक आहे.

उमेदवारांनी मुलाखतीच्या ठिकाणी वरिष्ठ निवासी संवर्गातील १८० दिवसांकरिता भरावयाच्या पदांची माहिती खालील प्रमाणे आहे.

पदाचे नावः- वरिष्ठ निवासी

एकुण पदे :- ५९

वरिल वरिष्ठ निवासी सवंर्गातील रिक्त पदांचे विषयनिहाय आवश्यक पदे खालीलप्रमाणे आहेत. उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार उमेदवाराचा प्रवर्ग व रिक्त पदाचे आरक्षण यांचा विचार करुन अंतिम निवड समितीच्या शिफारशीनूसार करण्यात येईल.

Sr No.	Subject	Total Post (59)	Reservation									
			SC	ST	VJ A / DTA	NT (B)	NT (C)	NT (D)	OBC	SBC	EWS	OPEN
			13%	7%	3%	2.5%	3.5%	2%	19%	2%	10%	38%
1	Medicine	2	1									1
2	General Surgery	4	1	1								2
3	Anaesthesia	2	1									1
4	Orthopaedics	3	1		1							1
5	Paediatric	0										
	Ophthalmology	2	1									1
6	OBGY	0										
7	Skin	1							1			
8	Psychiatry	2		1								1
9	Pulmonary Medicine	1					1					
10	Radiology	2	1						1			
11	ENT	1										1
12	Anatomy	4	1		1				1			1
13	Biochemistry	4		1			1	1				1
14	Physiology	4		1					1		1	1
15	PSM	0										
16	Microbiology	4							2	1		1
17	Pathology	4							2		1	1
18	Pharmacology	4							1		1	2
19	FMT	3							1		1	1
20	Emergency Medicine	10	1						1		2	6
21	Dentistry	2				1						1
	Total	**59**	8	4	2	1	2	1	11	1	6	23

उक्त नमुद दर्शविलेल्या रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील, तक्त्यात नमुद केलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व पदांसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून, वरील तक्तयाप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तदनंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

तसेच मा. आयुक्त वैद्यकीय शिखण, संशोधन व आयुष यांच्या कडुन बंधपत्रीत उमेदवार संबधीत विषयात या माविद्यालयात आल्यास अपली नियुकी तात्काळ समाप्त करण्यात येईल.

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरिल पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात १८० दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सुचना न देता तात्पुरत्या स्वरुपातील सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच वरिष्ठ निवासी या पदावर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना उपलब्ध विभागात काम करावे लागेल

अटी व शर्ती:-

१. वरिष्ठ निवासी या पदाची वेतनश्रेणी शासन निर्णय क्रमांक एलईसी-४३२२/प्र क्र.२०१/वैसेवा-३ दि. ०६/०१/२०२३ व शासन निर्णय क्रमांक एमईडी-२००८/प्र.क्र.३९३/शिक्षण-२ दि.०२/१२/२०१३ अन्वये रु.२५०००/- मुळ वेतन व प्रचलित दराने देय होणारा महागाई भत्ता लागु राहील.

२. वयोमर्यादा किमान व कमाल वयोमर्यादा वरिष्ठ निवासी

३. महाराष्ट्रातील शासकीय संस्थेतून पास झाला असल्यास त्यास प्राध्यान्य देण्यात येईल. महाराष्ट्रातील इतर शासकीय शासकीय संस्थेतून पास झालेला उमेदवार उपलब्ध नसल्यास खाजगी संस्थेतून व इतर राज्यातून आलेल्या उमेदवारांना विभागाची निवड लक्षात घेता प्राध्यान्य देण्यात येईल.

वयोमर्यादा गणण्याचा दिनांक	किमान वय	कमाल वय				
		सर्वसाधारण/महिला		प्राविण्य प्राप्त खेळाडू		दिव्यांग उमेदवार
		अराखीव (खुला)	मागासवर्गीय/आर्थिकदृष्टया दुर्बल घटक /अनाथ	अराखीव (खुला)	मागासवर्गीय/आर्थिकदृष्टया दुर्बल घटक /अनाथ	
	१८	४०	४५	४३	४५	४५

४. शैक्षणीक अर्हता:-

पदाचे नाव	आवश्यक शैक्षणिक अर्हता	शेरा
वरिष्ठ निवासी	राष्ट्रीय आयुविज्ञान आयोग यांच्या मानकानुसार संबंधीत विषयात मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण (MD/MS/DNB/MDS)	

उपराक्त पदासाठीचे निकष खालीलप्रमाणे असून बंधपत्रीत उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

५. गुणवत्ता यादी ही पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या एमडी/एमएस/एमसीएच/डीएम/किंवा समतुल्य अर्हता प्राप्त परीक्षेच्या गुणांवर व मुलाखलती व्दारे ठरविण्यात येईल. संशोधन लेख (शोधनिबंध) राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

६. मुलाखतीला येते वेळेस मुळ प्रमाणपत्रे (ओरीजनल डॉकोमेंट) आसने बंधनकारक राहील.

७. जाहिरातीत प्रसिद्य करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याची अधिकार अधिष्ठाता यांना राखून ठेवलेले आहेत.

८. उमेदवार या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्था प्रमुखांचे नाहरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे, व त्याठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोदविला किंवा तसे असल्यास केव्हा (तारीख नमुद करावी) व तसेच अर्जा सोबत जोडावे.

९. ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत जास्त कालावधीपर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यत येईल.

१०. नियुक्ती नंतर निवासी डॉक्टरांनी कॉलेज आवारात राहणे बंधनकारक राहील.

टिप:-

१. निवड प्राप्त उमेदवारांना कोव्हिड-१९ तथा आपत्कालीन परिस्थीतीच्या अनुशंगाने सेवा करणे बंधनकारक राहील.

११. आवश्यक प्रमाणपत्रे- अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१. एम.बी.बी.एस ची सर्व गुणपत्रे व प्रयत्न प्रमाणत्र अंतरवासिता प्रमाणपत्र पासिंग व डिग्री प्रमाणपत्र

२. एम.डी/ एम.एस/डी.एन.बी. परीक्षा गुणपत्रीका पासिंग प्रमाणपंत्र डीग्री प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र

३. एम.बी.बी.एस. व एम.डी /एम.एस पदवी/ पदवीका एम.एन.सी नोंदणी प्रमाणपत्र तसेच आवश्यक असल्यास नोंदणीचे नुतनीकरण

४. बंधपत्र प्रमाणपत्र

५. अनुभव प्रमाणपत्र

६. मागासवर्गीय उमेदवारांसाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास वैध नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र

७. विजा.अ, भज.ब, भज.क, भज.ड, ईमाव, विमाप्र, साशेमाव तसेच आदुघसाठी प्रचलीत शासकीय नियमानुसार वैधता असलेले उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र आवश्यक.

८. जन्म तारखेचे प्रमाणपत्र

९. नावात बदल असल्यास गॅझेटची प्रत.

१०. आधार कार्ड व पॅन कार्ड ची प्रत.

११. सदर पदांकरिता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ १८० दिवसांसाठी व अत्यंत तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपात राहील. १८० दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रीक खंड देऊन पुन्हा १८० दिवसांसाठी नियुक्ती करिता विचार करण्यात येईल.

१२. निवड झालेल्या उमेदवारास पुण्यश्लोक अहिल्यादेवी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती. संस्थेतील कोणत्याही संलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल व तेथे काम करावे लागेल प्रशासनाची आवश्यक्ता असल्यास यापैकी कोणत्याही रुग्णालयात बदल होऊ शकेल अर्जा सोबत प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती सांक्षांकीत करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१३. सदर पदावर कार्यरत असताना आपणांस खासगी व्यावसाय करता येणार नाही.

१४. सदर नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणांस या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील या बाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१५. पदाचा राजीनामा देण्याकरिता १ महिण्याची पुर्व सुचना देणे आवश्यक राहील अन्यथा नोटीस न देता पदाचा राजीनामा दिल्यास शेवटच्या १ महिण्याचे देय वेतन शासन खाती जमा करण्यात येइल.

१६. भरती प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत कोणत्याही टप्प्यावर पदस्थितीमधे बदल होऊ शकतो.

नोटः- वरिल पद भरती प्रक्रियेतील पदांमध्ये बदल आरक्षणात बदल किंवा पदे कमी किंवा जास्त करणे तसेच ऐनवेळी जाहिरात, भरती प्रक्रियेला स्थगिती किंवा भरती प्रक्रिया रद करण्याचे सर्व अधिकार मा.अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत. त्यासाठी उमेदवारांनी भरलेली शुल्क परत केली जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी

अधिष्ठाता,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, व रुग्णालय, बारामती.

प्रति,

१. उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, पुण्यश्लोक अहिल्यादेवी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती.

२. सुचनाफलक- अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती.

३. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे, सोलापुर, कोल्हापूर, अंबाजोगाई, लातूर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपुर, धुळे, औरंगाबाद, चंद्रपुर, गोंदिया, सातारा, सिंधुदुर्ग, अलिबाग, उस्मानाबाद, परभणी, रत्नागिरी, नंदुरबार, जळगाव, जालना.

४. रोखपाल, रोखपाल शाखा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती. यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी महाविद्यालयाच्या इच्छुक सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी, उमेदवारांकडून (शासकीय सुटटी वगळुन) या कार्यालयातुन जाहिरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

५. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

६. मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

७. मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई.